केस नं. रेफ.आयडीए नं.45/2018
निशाणी यु–09

**<u>व्दितीयपक्षातर्फे साक्षीदार क. 1 ची साक्ष</u>**

**<u>शपथेवर साक्षीदाराची पुढील सरतपासणी – प्रथमपक्षातफे विधीज्ञ श्री.बी. आर.कावरे यांच्याव्दारा</u>**

मी निशाणी यु–09 वर पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असुन त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी अभिलेखावर यादी निशाणी यु–11 सोबत अनुक्रमांक 314 वर अनुभवाचा दाखला दाखल केला आहे. सदर दाखला शाखाअधिक्षक, औरंगाबाद–जालना ग्रामीण बॅक यांनी दिला आहे. त्या दाखल्यास निशाणी **<u>यु–60</u>** देण्यात येत आहे. रेकार्डवर ब्रॅच मॅनेजर यांनी सरव्यवस्थापक यांना दिलेले पत्र दाखल केलेले आहे, त्या पत्रावर ब्रॅच मॅनेजर यांची सही आहे, त्यास निशाणी क्र.**<u>यु–61</u>** देण्यात आले. सरव्यवस्थापक यांनी मला दिलेले पत्र दाखल केले आहे, त्यावर सरव्यवस्थापक यांची सही आहे, त्यास निशाणी **<u>यु–62</u>** देण्यात आले. सिनीअर मॅनेजर यांचे पत्र देखील मी दाखल केलेले आहे, त्यावर त्यांची सही आहे, त्यास निशाणी **<u>यु–63</u>** देण्यात आले. रेकॉर्डवर मी रिंजीनल मॅनेजर यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर केलेले आहे, त्यावर रिंजीनल मॅनेजर श्री. कुलकर्णी यांची सही आहे, ती मी ओळखतो, त्यास निशाणी **<u>यु–64</u>** देण्यात आले. मी दि.25.11.1998 चे प्रमाणपत्र देखील दाखल केलेले आहे, त्यास निशाणी **<u>यु–65</u>** देण्यात आले. मी अध्यक्ष, औरंगाबाद–जालना ग्रामीण बॅक यांच्याकडे केलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बराबर आहे, त्यास निशाणी **<u>यु–66</u>** देण्यात आले. मी सरव्यवस्थापक यांच्याकडे दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे, त्या प्रतीवर माझी सही आहे, त्यास निशाणी **<u>यु–67</u>** देण्यात आले. शाखा व्यवस्थापक यांनी मला दिलेले पत्र मी दाखल केलेले आहे, त्या पत्रास निशाणी **<u>यु–68</u>** देण्यात आले. ब्रॅच मॅनेजर यांनी मला दिलेले पत्र दाखल केलेले आहे, त्यास निशाणी **<u>यु–69</u>** देण्यात आले. रेकॉर्डवर मी परिशिष्ठाची प्रत दाखल केलेली आहे, (प्रथमपक्षाच्या वकीलांनी त्या प्रतीस निशाणी लावण्यास हरकत घेतली त्यांच्या

म्हणण्यानुसार त्या प्रतीवर तक्रारदाराची सही नसल्याने त्यास निशाणी लावता येणार नाही. सदर हरकत कायम ठेवुन त्या दस्तास निशाणी **<u>यु–70</u>** देण्यात आले.) मी अध्यक्ष औरंगाबाद–जालना ग्रामीण बॅक यांच्याकडे दिलेल्या अर्जाची स्थळप्रत दाखल केलेली आहे, त्यावर माझी सही आहे, त्या प्रतीस निशाणी **<u>यु–71</u>** देण्यात आले. मी अध्यक्ष महाराष्ट गोदावरी ग्रामीण बॅक यांच्याकडे दिलेल्या अर्जाची स्थळप्रत दाखल केलेली आहे, त्यावर माझी सही आहे, त्या प्रतीस निशाणी **<u>यु–72</u>** देण्यात आले. मी रेकॉर्डवर माझ्या औरंगाबाद–जालना बॅक समर्थनगर या खात्याचा संगणकीकृत उतारा दाखल केलेला आहे. त्यास निशाणी **<u>यु–73 व यु–74</u>** देण्यात आला. रेकॉर्डवर मी महाराष्ट ग्रामीण बॅक येथे असलेल्या माझ्या खात्याचा उतारादेखील सादर केलेला आहे. सदर उतारा अनुक्रमांक 330 ते 351 वर आहे. (सदर खातेउता–यास निशाणी लावण्यास प्रथमपक्षाच्या वकीलांनी हरकत घेतली. त्यांच्या कथनानुसार सदर दस्त हे मुळ दस्ताच्या सत्यप्रती नाहीत, त्यावर बॅकेचा शिक्का व संबंधीत अधिका–याची सही नाही, त्यामुळे त्यांना निशाणी लावण्यात येवु नये. याउलट व्दितीयपक्षाच्यावकीलांनी कथन केले की, सदर दस्त हे साक्षीदाराच्या महाराष्ट ग्रामीण बॅकेतील खात्याचा उतारा असुन तो संगणकीकृत असल्याने त्यावर सही शिक्क्याची गरज नाही. सदर उतारा बॅकेच्या संबंधीत अधिका–याने दिलेला असल्याने तो ग्राहय धरता येईल.) प्रथमपक्षाने उपस्थित केलेली हरकत ही अंतीम निकालाच्या वेळेस लक्षात घेतली जाईल. सदर हरकतीस अधिन राहुन त्या दस्तांना निशाणी **<u>यु–75 ते यु–96</u>** देण्यात आले. मी अध्यक्ष महाराष्ट ग्रामीण बॅक मुख्य कार्यालया औरंगाबाद यांच्याकडे केलेला अर्ज रेकॉर्डवर दाखल केलेला आहे, त्यावर माझी सही आहे, त्यास निशाणी **<u>यु–97</u>** देण्यात आले.

सरतपास – पुर्ण

**<u>शपथेवर साक्षीदाराची उलटतपासणी – प्रथमपक्षातर्फे विधीज्ञ श्री. पी.एल.शहाणे यांच्याव्दारा</u>**

केस नं. रेफ.आयडीए नं.45/2018
निशाणी यु–09

श्री.शहाणे वकील यांनी आज रोजी साक्षीदाराचा पुढील सरतपास घेण्यात आला आहे, सरतपासात ब–याच कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात आलेला आहे, सदर कागदपत्रांचे अवलोकन करणे आवश्यक असल्यामुळे उलटतपासाकरीता वेळ देण्यात यावा अशी विनंती केली. सदर विनंतीवरुन उलटतपासाकरीता वेळ देण्यात आला.

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/–
(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
पिठासीन अधिकारी,
2रे कामगार न्यायालय क्रं.2, औरंगाबाद.

दिनांकः 16.09.2022
ठिकाणः औरंगाबाद